**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ च्या अंमलबजावणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- १ जुलै, २००५.**

**संदर्भ :-** शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-२०००/ प्र.क्र.(१७/२०००)/बारा,दिनांक २८ मार्च,२००५.

# परिपत्रक

राज्य लोकसंख्या धोरणाच्या अंतर्गत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ हे नियम दिनांक २८ मार्च,२००५ पासून अंमलात आले आहेत. त्यासंबंधीची संदर्भाधीन दिनांक २८ मार्च, २००५ ची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २८ एप्रिल,२००५ च्या राजपत्र भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेच्या प्रती सर्व मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख याना पाठविण्यात आल्या आहेत.

२. या अधिसूचनेद्वारे शासन सेवेतील गट "अ" ते "ड" मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी अधिसूचनेत विहित केलेली "लहान कुटुंबाची" अतिरिक्त अट लागू झालेली आहे. यास्तव यापुढे शासकीय सेवेत नोकरभरती करताना सदर नियमांचे काटेकोरपणे पालन करुन जाहिरातीमध्ये आवश्यक ती अट नमूद केली जाईल आणि सदर नियमातील प्रतिज्ञापन नमुना "अ" (मराठी व इंग्रजी नमुने शीघ्र अवलोकनासाठी सोबत जोडले आहेत.) नुसार सर्व उमेदवाराकडून प्रतिज्ञापन घेतले जाईल याची दक्षता सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी घ्यावी असे निर्देश याद्वारे देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(बा. बा.नारायणकर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* राज्य निवडणूक आयुक्त,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई, (२ प्रती प्रसिध्दीकरिता)
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,
*पत्राने.

D:\Jagtar\D-12-U.SG.R.22-6-2005(paripatrak)

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम,२००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना-अ

### प्र ति ज्ञा प न

**नमुना-अ**

**(नियम ४ पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी--------------------------------------------------------,

श्री.------------------------------------------------याचा/याची मुलगा/मुलगी/पत्नी,

वय-----वर्षे,राहणार,-------------------------------------------------------

यांद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

(१) मी-----------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला---------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८मार्च,२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या---------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च,२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :-**

**सही/-**

**दिनांक :-**

(कृपया मागे पहा....

# Declaration

## Form- A
## (See Rule- 4)

I, Shri./Smt/Kum ....................................................................................

son/daughter/wife of Shri. ........................................................................ aged

................ years, resident of ---------------------------------------------------------------------

....................................................................................................................................

do hereby declare as follows :-

1. That I have filled my application for the post of..........................................

2. I have ......................... (Number) living children as on today. Out of which no. Of children born after 28 th March, 2005 is .................................. .(Mention dates of birth, if any)

3. I am aware that if any total number of living children are more than two due to the children born after 28 th March, 2006 , I am liable to be disqualified for the same post.

Place :-

Date :- Signature

-------

3D:\Desk 12\G.Rgr 26.8.03

एच–592 –2अ.

शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण (Horizontal Reservation) कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16-अ,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक 16 मार्च, 1999.

वाचा:
1. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1077/3576/1433/16-अ, दि.23.5.1978.
2. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसईएम-1080/35/16-अ, दि.21.1.1980.
3. शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र.आयपीई/आरटीए-1080/0/181/16-अ, दि.10.10.1980.
4. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1094/1004/प्र.क्र.30/16-अ, दि.17.11.1994.
5. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब, दि.12.8.1994.
6. शासन निर्णय, न.व.वि. क्र.ईक्यूआर-1094/प्र.क्र.768/भूपुक-1, दि.9.8.1995.
7. शासन निर्णय, म.व.बा.क.वि. क्र.संकीर्ण-1096/प्र.क्र.30/का.-2, दि.1.8.1997.
8. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-1097/प्र.क्र.2/97/16-ब, दि.6.8.1997.
9. शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1097/प्र.क्र.12/97/16-अ, दि.2.5.1998.
10. अनिल कुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995(5)एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वे.

परिपत्रक :- शासनाने सेवेतील भरतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू केले आहे. हे आरक्षण सामाजिक आरक्षण (Social Reservation) असल्याने ते उभे आरक्षण (Vertical Reservation) आहे. त्याचप्रमाणे विशेष आरक्षण (Special Reservation) मागासवर्गीयांव्यतिरिक्त अन्य घटकांसाठी लागू केलेले आहे व ते समांतर किंवा आडवे आरक्षण (Horizontal Reservation) आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (ॲपलेट साईड) रिट याचिका क्रमांक:4067/1998 वरील निर्णयान्वये अनिलकुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995(5)एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयास अनुसरुन समांतर आरक्षणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सेवेतील उभे आरक्षण व समांतर आरक्षणाच्या संदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती व त्या बाबतच्या मार्गदर्शक सूचना शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावे.

2. सेवेतील नियुक्तीसाठी सामाजिक आरक्षण (उभे आरक्षण) खालीलप्रमाणे आहे :-

1. अनुसूचित जाती : 13%
2. अनुसूचित जमाती : 7%
3. विमुक्त जाती (अ) : 3%
4. भटक्या जमाती (ब) : 2.5%
5. भटक्या जमाती (क) : 3.5%
6. भटक्या जमाती (ड) : 2%
7. विशेष मागास प्रवर्ग : 2%
8. इतर मागास वर्ग : 19%

वर नमूद केलल्या आरक्षणाव्यतिरिक्त सेवेतील नियुक्त्यांसाठी लागू असलेले विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) पुढीलप्रमाणे आहे :-

1. माजी सैनिक 15% फक्त गट क आणि गट ड साठी
2. प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त 5% फक्त गट क आणि गट ड साठी
3. अपंग 3% गट अ आणि ब मधील कांही पदांसाठी तसेच गट क आणि गट ड साठी
4. महिला 30%

समांतर आरक्षण हे फक्त सरळ सेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये.

4. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्या प्रमाणे समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण ( Compartmentalised Reservation ) आहे, म्हणून पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.ज.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार येणा-या राखीव पदांची संख्या सुध्दा निर्देशित करावी.

5. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात/उल्लेखिलेल्या नुसार समांतर आरक्षणांतर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सरळसेवा भरती करताना खालील टप्पे विचारात घेण्यात यावेत :-

(अ) प्रथम टप्पा :- गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी, या यादीत, समांतर आरक्षणात असणा-यांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्‌भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर समांतर आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाकरीता त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ट करावेत.

(ब) दुसरा टप्पा :- त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार करण्यात (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा 'अ' मध्ये सामिल झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.)

(क) तिसरा टप्पा :- वरील 'ब' नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील (Social Reservation ) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार 'अ' येथे विशद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गातर्गत राहावे.

6. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्यानुसार विशेष आरक्षण हे प्रत्येक उभ्या आरक्षणाच्या कक्षांतर्गत राहील. म्हणजेच विशेष आरक्षण हे एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातून दुस-या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थानांतरीत करता येणार नाही.

7. सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी वरील कार्यपध्दती तसेच सूचनांनुसार यापुढे न चुकता कार्यवाही करावी. हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भि.रा.वाढवे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा, खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, अपील शाखा, खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने.

एच-1445(5000-3-99)-अ.

ज्ञापन क्रमांक-आरसीटी-०३१०/प्र.क्र.२१२/पोल-५(अ),
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ एप्रिल, २०१०.

विषय :- **पोलीस भरती सन २००९ बाबत मार्गदर्शन.**

**ज्ञापन:-** पोलीस भरतीमध्ये, अनुसूचित जाती व जमाती व्यतिरिक्त इतर प्रवर्गातील उमेदवारांकडे जात प्रवर्गाचे प्रमाणपत्र आहे, परंतु त्यांच्याकडे नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र नाही, अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील नियुक्तीसाठी परीक्षेस बसण्याकरिता मागासवर्गीयांसाठी असलेली वयोमर्यादेतील सवलत देय आहे किंवा कसे याबाबत अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक-प्रशि/पोशि-भरती/मार्गदर्शन/बीड/२०१०/१२०३, दिनांक २० मार्च, २०१० अन्वये मार्गदर्शन मागविलेले आहे. त्याबाबत मला असे कळविण्याचे आदेश आहेत की, सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८ (आरक्षण कायदा) या अधिनिमाच्या इतर तरतुदींच्या अधिन राहून कलम ४(२) च्या परंतुकानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमी लेअरचे) तत्त्व लागू करण्यात आलेले आहे. क्रिमी लेअरचे तत्त्व लागू करण्यात आलेल्या प्रवर्गातील उमेदवारांना जाती प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अशी दोन्ही प्रमाणपत्रे असतील तरच आरक्षणविषयक लाभ देय ठरतील. ही दोन्ही प्रमाणपत्रे नसतील तर आरक्षणविषयक लाभ देय ठरणार नसून अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात यावे व खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या वयोमर्यादेच्या अटी त्यांना लागू राहतील.

२. हे ज्ञापन सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२६२/१६-ब, दिनांक-१.४.२०१० व क्र.४८८/१२, दिनांक १५.४.२०१०, विधी व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-१६९ए, दिनांक १.४.२०१० तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे अनौपचारिक संदर्भ क्र.१८/मावक-५, दिनांक १२.४.२०१० अन्वये त्या विभागांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(सदानंद जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन,गृह विभाग,

प्रत,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्रे,
सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,
सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१६ब)(कार्यासन-१२), मंत्रालय, मुंबई,
सामाजिक न्याय विभाग, कार्यासन-मावक-५, मंत्रालय, मुंबई,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती-कार्यासन-पोल-५अ.

**भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोटयातील गट 'क' वर्गीय पदे भरताना अनुसरावयाची कार्यपध्दती.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमाक :- प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १९ ऑक्टोबर,२००७.

**वाचा** : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-३०९९/५५५/प्र.क्र.६९-९९/१३-अ, दिनांक ११.६.१९९९.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं -३०९९/ ५५५/प्र.क्र.६९/९९/१३-अ, दिनांक १५.६.१९९९.

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं-३०९९/५५५/प्र.क्र.६९/९९/१३-अ, दिनांक १.७.१९९९.

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं-३०९९/५५५/प्र.क्र.६९/९९ (भाग-३)/१३-अ, दिनांक ३१.१२.२००१.

५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-१००३/प्र.क्र.९६/२००३/१३-अ, दिनांक १९.११.२००३.

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-३००४/प्र.क्र.३२/२००४/१३-अ, दिनांक ९.६.२००४.

७) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-१००४/४०७/प्र.क्र.३७/०४/१३-अ, दिनांक १०.१२.२००४.

८) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२००५/प्र.क्र.२३/२००५/१३-अ, दिनांक ९.१.२००६.

९) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२००६/२१३/प्र.क्र.३९/०६/१३-अ, दिनांक १५.९.२००६.

१०) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२००६/प्र.क्र.१७१/२००६/१२, दिनांक १७.२.२००७.

## शासन निर्णय

राज्य शासनाच्या दुय्यम सेवेतील गट "क" मधील उमेदवारांची निवड करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली सहा प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे व महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ, मुंबई, ही कार्यालये दि. ११/६/९९ रोजी शासनाने बरखास्त केली आहेत व भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट 'क' वर्गीय पदांवरील उमेदवारांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय पदांकरिता

जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तसेच विभागीय व राज्यस्तरीय पदांवर उमेदवारांची निवड करण्याकरिता मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी विभाग प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली निवड समित्या गठीत करून उमेदवारांची निवड करावी असे आदेश देण्यात आले आहेत. तद्‌नंतर संदर्भाधीन अनु. क्र. ४ ते १० येथील आदेशान्वये सेवाभरतीच्या अनुषंगाने अन्यही काही आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि, अर्जासोबत आकारावयाचे परीक्षा शुल्क, मुलाखतीस बोलविण्यासाठी उमेदवारांची संख्या, निवडसूचीत समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या, निवडसूचीची कालमर्यादा, इ.बाबत शासनाकडून आदेश निर्गमित न झाल्याने निवड प्रक्रिया करताना नियुक्ती प्राधिका-यांना अडचणी उद्‌भवत आहेत व त्याच्यांकडून सेवाभरतीची वेगवेगळी कार्यपध्दती अनुसरली जात आहे. यास्तव सदरच्या कामात एकसूत्रता, नि:पक्षपातीपणा आणि समान दर्जा असणे तसेच उमेदवारांना समान संधी व समान न्याय देणे आवश्यक असल्यामुळे सेवाभरतीच्या कार्यपध्दतीसंबंधात एकत्रित आदेश निर्गमित करणे व संदर्भाधीन अनु. क्र. ६ येथील दि.९/६/२००४ च्या आदेशान्वये निश्चित करण्यात आलेल्या लेखी व तोडी परीक्षेच्या गुणांमध्ये सुधारणा करणे या बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या. त्यानुसार शासनाने असा निर्णय घेतला आहे की, राज्य शासनाच्या दुय्यम सेवांमध्ये (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येणारी पदे वगळून) गट 'क' च्या पदांवरील उमेदवार निवडण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असावी :-

## २. <u>निवड समित्यांची स्थापना</u>

**(अ) जिल्हा निवड समिती :-** जिल्हास्तरीय गट 'क' ची पदे भरण्याकरिता जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे जिल्हा निवड समितीची रचना करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| (१) जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| (२) मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| (३) जिल्हा सेवायोजन अधिकारी | सदस्य |
| (४) जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| (५) जिल्हा आदिवासी विकास अधिकारी | सदस्य |
| (६) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी | सदस्य |
| (७) ज्या कार्यालय/विभागातील पदे भरावयाची- आहेत त्या कार्यालयाचे/विभागाचे विभाग प्रमुख अथवा त्यांचे गट "अ" मधील प्रतिनिधी (सामायिक संवर्गातील उदा: लिपिक-टंकलेखक, वरीष्ठ लिपिक, वाहनचालक इ. पदांवर भरती करताना अ.क्र.७ येथील सदस्याचा समितीमध्ये समावेश असणार नाही.) | सदस्य |

**(ब) प्रादेशिक व राज्य स्तरीय निवड समित्या :-** प्रादेशिक व राज्यस्तरीय गट 'क' च्या पदांवर उमेदवारांची निवड करण्याकरिता सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी प्रादेशिक विभाग प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशिक निवड समित्या व विभाग प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय निवड समित्या स्थापन करण्याचे आदेश निर्गमित करावेत.

उपरोक्त जिल्हास्तरीय, प्रादेशिक व राज्यस्तरीय निवड समित्यांवर अ.जा./अ.ज./इ.मा.व. यामधून एक प्रतिनिधी व अल्पसंख्याकामधून एका प्रतिनिधीची नियुक्ती करण्यात यावी. तसेच अशा निवड समितीमध्ये सर्वसाधारण प्रवर्ग किंवा उपरोक्त प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गामधील एक प्रतिनिधी महिला असणे अनिवार्य आहे. त्यामुळे निवड समिती गठीत करताना वरील अटींची पूर्तता होईल याची दक्षता घेण्यात यावी. वरील अटी पूर्ण होत नसल्यास निवड समितीमध्ये अतिरिक्त सदस्याची नियुक्ती करून सदर अटींची पूर्तता करण्यात यावी. मात्र निवड समितीमधील कोणताही सदस्य गट 'अ' स्तरापेक्षा कमी स्तरावरील नसेल.

**(क) जिल्हा निवड समित्यांसाठी निवड प्रक्रियेचा कालबध्द कार्यक्रम :-** जिल्हा निवड समितीकडून निश्चित कालावधीत उमेदवारांची शिफारस करणे शक्य व्हावे म्हणून संबंधित जिल्हयातील विविध विभागांच्या अधिपत्त्याखालील कार्यालय प्रमुखांनी संदर्भाधीन अनु. क्र. १० येथील आदेशानुसार आपल्या अधिपत्त्याखालील जिल्हास्तरीय पदांचा नियमितपणे आढावा घेऊन नामनिर्देशनाच्या कोटयातील भरतीयोग्य रिक्त पदे निश्चित करून या आदेशासोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविल्यानुसार विहित मुदतीत संबंधित जिल्हा निवड समितीकडे मागणीपत्र पाठविण्याची दक्षता घ्यावी व जिल्हा निवड समित्यांनी परिशिष्ट 'अ' मध्ये निश्चित केल्यानुसार विहित कालावधीत निवड प्रक्रियेची कार्यवाही करावी.

मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्त्याखालील प्रादेशिक व राज्य स्तरीय रिक्त पदे त्यांनी गठीत केलेल्या प्रादेशिक व राज्य स्तरीय निवड समित्यांकडून दरवर्षी नियमितपणे विहित निवड प्रक्रिया अनुसरून भरली जातील, याबाबत दक्षता घ्यावी.

**३. <u>रिक्त पदांबाबतची जाहिरात प्रसार माध्यमातून देण्याबाबत</u>** :- रिक्त पदे भरताना संबंधित रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून (सेवायोजन कार्यालये) ज्येष्ठतेनुसार यादी प्राप्त करून घेण्यात यावी. त्याचबरोबर रिक्त पदांची जाहिरात वर्तमान पत्रातून देण्यात यावी. तसेच रिक्त पदांबाबतची माहिती नोटीस बोर्डावर लावून अर्ज मागविण्यात यावे व वरील सर्व प्रकारे प्राप्त होणा-या याद्यांमधून/अर्जांमधून पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्यात यावी.

वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देताना संबंधित क्षेत्रात खप असलेल्या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात यावी व त्यापैकी किमान एक वृत्तपत्र मराठी असले पाहिजे. <u>सदरची जाहिरात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत देणे अनिर्वाय राहील.</u> संबंधित क्षेत्रात जेवढी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे (सेवायोजन कार्यालये) असतील त्या सर्व कार्यालयांना रिक्त पदांच्या संख्येबद्दल माहिती देण्यात यावी. मागासवर्गीयांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांवरील नेमणुकीसाठी उमेदवारांची आवश्यकता असेल त्याबाबतीत संचालक, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य किंवा संबंधित समाज कल्याण अधिकारी यांनाही पदांच्या संख्येबाबत माहिती देण्यात यावी. तसेच संबंधित माहितीची प्रत रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयास पाठविण्यात यावी. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे रिक्त पदांची माहिती देतानाच सदर पदांची जाहिरात रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करण्याबाबत संदर्भाधीन अ.क्र. ९ येथील दि. १५/९/२००६ च्या परिपत्रकात नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी. व ज्या उमेदवारांची निवड समितीमार्फत नेमणूकीसाठी निवड

करण्यात येईल, अशा उमेदवारांची यादी निवड समिती मार्फत संबंधित रोजगार व स्वयंरोजगार केंद्राकडे पाठविण्यात यावी. जेणेकरून निवड झालेल्या उमेदवारांची नावे रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या रजिस्टरमधून कमी केली जातील.

४. **अर्जासोबत शुल्क (फी) आकारण्याबाबतः-** उमेदवारांकडून अर्जासोबत पुढीलप्रमाणे परीक्षा शुल्क महाराष्ट्र राज्याचे न्यायालयीन फी मुद्रांकाच्या स्वरूपात (कोर्ट फी स्टॅम्प) आकारण्यात यावेः-

| | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| (१) **लेखी परीक्षा** | रू.१५०/- | रु.७५/- |
| (२) **लेखी परीक्षा व मुलाखत** | रू.२००/- | रू.१००/- |

(३) **माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.**

क्वचित प्रसंगी अर्जदाराला न्यायालय फी मुद्रांक (कोर्ट फी स्टॅम्प) मिळविणे शक्य नसेल तर त्याबाबतीत रेखांकित भारतीय पोस्टल ऑर्डरव्दारे आवेदन शुल्क स्वीकारण्यात यावे.

५. **लेखी व तोंडी परीक्षा घेण्याबाबत :-**

(१) लिपिक वर्गीय पदांसाठी उमेदवारांची निवड करताना मुलाखती न घेता फक्त लेखी परीक्षा घेण्यात यावी व लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करून निवड यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात यावी.

(२) ज्या पदांसाठी व्यवसायिक चाचणी (Proficiency Test) घेणे आवश्यक असेल अशा पदांसाठी ५० % गुणांची लेखी परीक्षा, ४० % गुणांची व्यावसायिक चाचणी व मुलाखतीसाठी १० % इतके गुण ठेवून उमेदवरांची निवड करून गुणवत्तापात्र उमेदवारांच्या नियुक्तीसाठी शिफारशी करण्यात याव्यात. जे उमेदवार लेखी परीक्षेत उत्तीर्ण होतील अशानाच ही व्यावसायिक चाचणी देता येईल.

(३) शालांत परीक्षा उत्तीर्णपेक्षा कमी अर्हता आवश्यक असलेल्या उदा. सुतार, गवंडी, वाहनचालक इत्यादी संवर्गातील पदांसाठी व्यावसायिक चाचणी, आवश्यक तेथे शारिरीक क्षमतेची चाचणी व मुलाखत घेणे आवश्यक असल्यामुळे अशा उमेदवारांची निवड करताना ५० गुणांची व्यावसायिक चाचणी, आवश्यक तेथे ४० गुणांची शारिरीक क्षमतेची चाचणी व मुलाखतीसाठी १० गुण ठेवून उमेदवारांची निवड करण्यात यावी.ज्या पदांसाठी शारीरिक क्षमतेची चाचणी घेण्याची आवश्यकता नाही अशा पदांसाठी ९० गुणांची व्यावसायिक चाचणी व मुलाखतीसाठी १० गुण ठेवून उमेदवारांची निवड करण्यात यावी.

(४) अन्य पदांसाठी २०० गुणांची लेखी परीक्षा व २५ गुणांची तोंडी परीक्षा घेऊन उमेदवारांची निवड करण्यात यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करताना ज्यावेळी लेखी व तोंडी परीक्षा घेऊन उमेदवारांची निवड करण्यात येईल त्यावेळी तोंडी परीक्षेस एकूण गुणांच्या १२.२ टक्के इतक्या गुणांपेक्षा अधिक गुण ठेवता येणार नाहीत.

**६. लेखी परीक्षा** :- लेखी परीक्षेला पुढीलप्रमाणे प्रश्नपत्रिका ठेवण्यात येतील:-

(१) ज्या पदाकरिता कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १०वी) आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

(२) ज्या पदांकरिता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२वी) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

(३) ज्या पदांसाठी लेखी परीक्षा, व्यावसायिक चाचणी व मुलाखत घेऊन निवड करावयाची आहे अशा पदांसाठी वरीलप्रमाणे विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी २५ गुण ठेवून १०० गुणांची लेखी परीक्षा, ८० गुणांची व्यावसायिक चाचणी व मुलाखतीस २० गुण ठेवून निवड करण्यात यावी.

वरील परीक्षेंच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील.

जिल्हास्तरीय पदांसाठी निवड होणा-या उमेदवारांना संबंधित जिल्हयाचा भुगोल, सामाजिक इतिहास, हवामान इ. स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे. यास्तव सामान्य ज्ञान या विषयाची प्रश्नपत्रिका तयार करताना सदर बाब विचारात घेण्यात यावी.

**७. <u>मुलाखतीस बोलविण्यासाठी उमेदवारांची संख्या</u> :-**

लेखी परीक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणानुक्रमानुसार मुलाखतीसाठी बोलविण्यात येणा-या उमेदवारांची संख्या खाली नमूद केल्याप्रमाणे असावी :-

| रिक्त पदांची संख्या | मुलाखतीसाठी बोलावयाच्या उमेदवारांची संख्या |
|---|---|
| (i) ५ पदांपर्यंत | रिक्त पदांच्या संख्येच्या ५ पटीत मात्र उमेदवारांच्या १५ इतक्या संख्येपर्यंत मर्यादित. |
| (ii) ६ व त्याहून अधिक | ३ पटीत. |

एखादा उमेदवार लेखी परीक्षेत अधिक गुण मिळवून देखील मुलाखतीला गैरहजर राहिल्यास त्याची नियुक्तीसाठी शिफारस करता येणार नाही. मात्र एखादया उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर अशा उमेदवाराची शिफारस करण्यात यावी.

## ८. निवडसूचीत समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या :-

निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या प्रवर्गनिहाय उमेदवारांची संख्या खालीलप्रमाणे असावी :-

| | प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय संख्या |
|---|---|---|
| १) | १० पदांपर्यत | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करावा. |
| २) | ११ ते ३० | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा परंतु किमान ०५ इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करण्यात यावा. |
| ३) | ३१ व त्याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २० टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा परंतु किमान ०८ इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करण्यात यावा. |

वरीलप्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करताना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील संख्या विचारात घेण्यात यावी. त्याचप्रमाणे निवडसूचीसाठी रिक्त पदांची संख्या विचारात घेताना लेखी परीक्षेच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या महिन्याच्या अखेरपर्यंत निवड समितीकडे लेखी स्वरूपात प्रत्यक्ष मागणी प्राप्त झालेली असेल तितकीच रिक्त पदे निवडसूचीसाठी विचारात घेण्यात यावी व कोणती पदे कार्यालयनिहाय व प्रवर्गनिहाय निवडसूची तयार करताना विचारात घेण्यात आली आहेत याची लेखी स्वरूपात निवड समितीने नोंद ठेवावी.

**९. निवडसूचीची कालमर्यादा :-** निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा नवीन सूची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जाती प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवारांची मागणी निवड समितीकडे नियुक्ती प्राधिका-यास करता येईल. अशी मागणी आल्यास निवड समितीने निवडसूचीच्या विधी ग्राहयतेच्या आधीन राहून सदर निवड सूचीमधून ज्येष्ठतेनुसार व प्रवर्गानुसार पुढील उमेदवारांची शिफारस करावी. मात्र निवडसूची तयार करताना विचारात घेतलेल्या रिक्त पदांच्या व्यतिरिक्त नंतर मागणी आलेल्या किंवा रिक्त झालेल्या पदांसाठी सदर निवडसूचीमधून नियुक्तीसाठी उमेदवारांची शिफारस करता येणार नाही. सदरची रिक्त पदे नव्याने निवडप्रक्रिया करून भरण्यात यावी. त्यामुळे नव्याने पात्रता धारण करणा-या उमेदवारांना संधी मिळेल.

१०. **<u>मानधन</u>** :- निवड समित्यांकडून घेण्यात येणा-या निरनिराळया स्पर्धा परीक्षांच्या कामाकरिता नियुक्त करण्यात येणा-या केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक, समवेक्षक, प्राश्निक, परीक्षक, लिपिक तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी इत्यादीं जो कर्मचारीवृंद नेमावा लागतो तो महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणा-या स्पर्धा परीक्षांकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार नेमण्यात यावा. तसेच त्यांना त्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून ज्या दराने मानधन देण्यात येते त्याच दराने मानधन अनुज्ञेय राहील.

**११.** निवड प्रक्रियेच्या कामाकरिता होणा-या खर्चासाठी विभागप्रमुख/ प्रादेशिक विभागप्रमुख/ जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या अंदाजपत्रकात तरतूद करावी व मंजूर केलेल्या अनुदानातून खर्च भागविण्यात यावा.

**१२.** निवड समितीचे सर्व निर्णय निवड समितीकडून अभिलिखित करण्यात यावेत.

**१३.** संदर्भाधीन क्र. ६ येथील समक्रमांकाचे दि. ९ जून, २००४ चे शासन आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**१४. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. परंतु ज्या प्रकरणी हे आदेश निर्गमित होण्यापूर्वी निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे व अशा निवड प्रक्रियेमध्ये लेखी परीक्षेच्या टप्प्यावरील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे, अशा प्रकरणी हे आदेश लागू होणार नाहीत. सदर प्रकरणी प्रचलित आदेशुनसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच या आदेशासोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये निश्चित करण्यात आलेला कालबध्द कार्यक्रम सन २००८ पासून लागू करण्यात येत आहे.**

**१५.** सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील आदेश त्यांच्या प्रशासकीय अधिपत्त्याखालील सर्व कार्यालयांना /नियुक्ती प्राधिका-यांना कळवावे आणि या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल याबाबत दक्षता घ्यावी.

**१६.** हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३६८/व्यय-४/०७ दिनांक १८/७/२००७ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

**१७.** हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **WWW.Maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००७१०१९१२४५०९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सतीश त्रिपाठी )
अपर मुख्य सचिव (सेवा),
महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,

मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व विधान परिषद व विधान सभा सदस्य,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मंबई,
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१,महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२,महाराष्ट्र, नागपूर,
* मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग,मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,मुळ न्यायशाखा,मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा,मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई,मंत्रालय,मुंबई(२प्रती)
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती,
* पत्राने.

**सा.प्र.वि. शा.नि. क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.१९ ऑक्टोबर,२००७ सोबतचे परिशिष्ट.**

## <u>प रि शि ष्ट - ‘अ’</u>

जिल्हास्तरीय रिक्त पदांवरील नेमणूका करण्यासाठी खालीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम निश्चित करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| (अ) | नियुक्ती प्राधिका-यांनी जिल्हा निवड समितीकडे मागणीपत्र पाठविणे. | - दरवर्षी १५ जून पर्यंत |
| (ब) | जिल्हा निवड समितीने जाहिरात प्रसिध्द करणे | - दरवर्षी जुलै महिन्यात |
| (क) | जिल्हा निवड समितीने लेखी परीक्षा घेणे | - दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात |
| (ड) | जिल्हा निवड समितीने मुलाखती घेणे | - दरवर्षी डिसेंबर अखेरपर्यन्त |

नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्या व त्यांच्या अधिपत्त्याखालील कार्यालयात किती जिल्हा स्तरीय पदे नामनिर्देशनाने भरतीसाठी रिक्त आहेत व भरती वर्षात डिसेंबर अखेरपर्यंत किती पदे रिक्त होतील (उदा. सेवानिवृत्ती, पदोन्नती इत्यादीमुळे) याचा अंदाज घेऊन दरवर्षी १५ जूनपर्यंत प्रस्तुत शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ‘ब’ मध्ये दर्शविलेल्या विहित नमुन्यात जिल्हा निवड समितीकडे मागणीपत्र पाठवावे. तसेच मागणी ‘ निरंक ’ असल्यास तसेही जिल्हा निवड समितीस कळविण्यात यावे.

नियुक्ती प्राधिाका-यांनी निवड समितीकडे मागणीपत्र पाठविण्याची मुदत संपताच जिल्हा निवड समितीने, मागणी आलेल्या एकूण पदांची संवर्गनिहाय व प्रवर्गनिहाय संख्या निश्चित करून पदांची जाहिरात विहित कालावधीत प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करावी.

निवड समितीकडे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या मागणीपत्रांमधील मागणीवर पुढील वर्षाच्या कालबध्द कार्यक्रमानुसार विचार करण्यात यावा. परंतु संबंधित निवड समितीने ज्या संवर्गातील पदांसाठी अगोदरच कालबध्द कार्यक्रमानुसार जाहिरात प्रसिध्द केली असेल व त्याच संवर्गातील पदांचा दिनांक १५ जून नंतर परंतु लेखी परीक्षेच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या महिन्याच्या अखेरपर्यंत प्राप्त झालेल्या मागणीपत्रामध्ये समावेश असल्यास अशावेळी सदर मागणीपत्रामधील संबंधित संवर्गातील पदांचा समावेश निवड सूची तयार करण्यासाठी रिक्त पदांची संख्या विचारात घेताना करण्यात यावा व मागणीपत्रातील उर्वरित संवर्गातील पदांचा पुढील वर्षाच्या कालबध्द कार्यक्रमानुसार विचार करण्यात यावा.

------

## प रि शि ष्ट - 'ब'

उमेदवारांची भरती करण्यासाठी निवड समितीकडे पाठविण्याचा मागणीपत्राचा नमुना

१) कार्यालय/विभाग आणि पत्ता :

२) पदाचे नाव :

३) नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांची संख्या :

अ) स्थायी

ब) अस्थायी

४) पदांच्या आरक्षणाचा तपशील :

| **अ) अनुशेष पदांची संख्या** | **पदसंख्या** | **महिला** | **अपंग** | **मा.सै.** | **खेळाडू** | **इतर** |
|---|---|---|---|---|---|---|
| १) अनुसूचीत जाती व अनुसूचीत जातीतील धर्मांतरीत बौध्द : | | | | | | |
| २) अनुसूचीत जमाती : | | | | | | |
| ३) वि.जा.(अ) : | | | | | | |
| ४) भ.ज.(ब) : | | | | | | |
| ५) भ.ज.(क) : | | | | | | |
| ६) भ.ज.(ड) : | | | | | | |
| ७) इतर मागास वर्गीय : | | | | | | |
| ८) विशेष मागास प्रवर्ग : | | | | | | |
| **एकूण** | | | | | | |

| **ब) चालू रिक्त पदांची संख्या** | **पदसंख्या** | **महिला** | **अपंग** | **मा.सै.** | **खेळाडू** | **इतर** |
|---|---|---|---|---|---|---|
| १) अनुसूचीत जाती वअनुसूचीत जातीतील धर्मांतरीत बौध्द : | | | | | | |
| २) अनुसूचीत जमाती : | | | | | | |
| ३) वि.जा.(अ) : | | | | | | |
| ४) भ.ज.(ब) : | | | | | | |
| ५) भ.ज.(क) : | | | | | | |
| ६) भ.ज.(ड) : | | | | | | |
| ७) इतर मागास वर्गीय : | | | | | | |
| ८) विशेष मागास प्रवर्ग | | | | | | |
| ९) खुला : | | | | | | |
| **एकूण** | | | | | | |

५) पद ज्या वर्गातील व सेवेतील असेल तो वर्ग
व ती सेवा :

६) परिवीक्षा कालावधी असल्यास :

७) नोटीस देऊन नियुक्ती समाप्ती करण्यात येते
काय, असल्यास, कोणत्या शर्तीवर ?

८) (अ) कर्तव्ये

(ब) उमेदवारांना जेथे सेवा करावी लागेल
त्या कार्यालयाचे /कार्यालयाचें ठिकाण /ठिकाणे

९) निवडण्यात आलेल्या उमेदवारांना कामावर केव्हा
यावे लागेल?

१०) वेतनश्रेणी ---

(अ) थेट सेवा प्रविष्ठांसाठी

(ब) किमान वेतनापेक्षा अधिक असणा-या प्रारंभीच्या
वेतनासाठी केलेली विनंती विचारात घेण्यात येईल
काय, तसे असेल तर त्याची मर्यादा व कारणे
कोणती असतील?

११) नमुद करणे इष्ट असेल तर, पदोन्नतीच्या संधी

१२) आवश्यक अहर्ता ---

(अ) शिक्षण

(ब) प्रशिक्षण

(क) अनुभव

(ड) कोणतीही इतर अर्हता

(ई) (अ), (ब), (क), आणि (ड) यातील
आवश्यक गोष्टींचे काटेकोरपणे पालन होणार
आहे काय, तसे नसेल तर वरील बाबींच्या संबंधात
शिथिलता किती प्रमाणात अनुज्ञेय असेल ते नमुद
करण्यात यावे.

(फ) समान अर्हतेचा स्वीकार करता येईल काय
अशा अर्हता कोणत्या ?

१३) वयोमर्यादा (कोणतीही असल्यास)

१४) राष्ट्रीयत्व

१५) अधिवास

१६) वरील प्रश्नांच्या कक्षेत न आलेल्या कोणत्याही इतर शर्ती अथवा अर्हता

मागणीपत्र पाठविणा-या अधिका-याची सही व पदनाम

दिनांकः-

स्थानः-

**शासकीय,निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवणेबाबत...**

# महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र.४१५ /का-२

नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक- २५.५.२००१

**निर्णय :-** शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा दि.१ एप्रिल,१९९४ पासून राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सदर ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत परिशीष्ठ-१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून महिलांच्या ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे एकत्रित आदेश देण्यात येत आहेत. हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी महिलांच्या ३०% आरक्षणासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही ही परिशिष्ट-१ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे असे समजण्यात यावे.

## (एक) आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती

(१) शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्था यांच्या सेवेत नियुक्तीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

(२) महिलांच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करताना अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदापैकी त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

(३) महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण राहिल व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्रक्र.३१/९८/१६-अ, दि.१६.३.९९ मधील मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही करावी.( प्रत सोबत जोडली आहे) सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

(४) महिलांसाठी विहीत करण्यात आलेले सदर ३०% आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(५) महिला आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत महिला आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या, सामाजिक आरक्षण/उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), (क) (ड), वि.मा.प्र., इमाव, आणि खुला प्रवर्ग ) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

(६) महिलांसाठीचे सदर आरक्षण हे मागासवर्गीयांचे आरक्षण ज्या ज्या ठिकाणी लागू आहे त्या सर्व ठिकाणी लागू राहील.

(७) भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे.

(८) महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येवू नये.

(९) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला संदस्यांना महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला संदस्यांना महिलांचे ३० % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(१०)खुल्या प्रवर्गातील ज्या व्यक्तींचे /कुटुंबाचे सर्व मार्गांनी येणारे एकूण वार्षिक उत्पन्न सलगच्या मागील तीन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु.दोन लाख किंवा त्यापेक्षा अधिक असेल ती व्यक्ती/कुटुंब उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट म्हणून समजण्यात येईल. या संदर्भातील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये विवाहीत महिलेच्या बाबतीत पती,पत्नी व मुले यांचा समावेश राहील. आणि अविवाहीत मुलीच्या संदर्भात आई, वडील व अविवाहीत भावंडे यांचा समावेश राहील.

(११)इतर मागावर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) यांचेकरीता उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेअर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले निकष व अटी लागू राहतील.

(१२)सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागामार्फत इतर मागासवर्गासाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) बाबाबतची उत्पन्न मर्यादा वाढविल्यास सदर वाढीव उत्पन्न मर्यादा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आपोआप लागू राहील.

(१३) मागासवर्गीयांचे आरक्षित प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांना सेवा भरतीसाठी जे सेवाभरती नियम, अटी व शर्ती लागू आहेत तेच सेवाभरती नियम, अटी व शर्ती त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या आरक्षणाबाबतही लागू राहतील.

(१४) महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात यावे.

(१५) महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

## (दोन) प्रमाणपत्रे

### (अ) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र व त्याची तपासणी

(१) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.याबाबतचा अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना परिशीष्ठ २ व ३ म्हणून सोबत जोडला आहे.

(२) वरील प्रमाणपत्राच्या आधारे ज्या महिलांना आरक्षणाचा लाभ देण्यात येईल त्यांची प्रमाणपत्रे तपासण्यास आयुक्त, महिला व बाल विकास ,महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकाऱ्यांकडून महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या महिलांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदांकरिता केलेला अर्ज संबंधित विभागांनी /कार्यालयांनी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे तपासणीसाठी पाठवावा.

(४) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी सदर प्रमाणपत्र या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार आहे किंवा नाही हे तपासावे. तसेच, सदर प्रमाणपत्राच्या पृष्ठयर्थ संबंधित उमेदवाराने या शासन निर्णयातील परिशीष्ठ-२ मधील अर्जान्वये प्रमाणपत्र मिळण्याकरिता जी माहिती सादर केली असेल ती माहित्ती मुळ कागदपत्रांवरुन तसेच आवश्यकता वाटल्यास गृहभेटी देवून तपासून घ्यावी. व सर्व माहीती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र प्रमाणित करुन संबंधित कार्यालयांना परत पाठवावे.

(५) जर एखादया प्रमाणपत्राबाबत आयुक्त, महिला व बाल विकास , महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना शंका असल्यास त्यांनी याबाबतचा सविस्तर तपशील आपल्या अहवालात नमूद करावा.

(६) ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी तपासून प्रमाणित केली असतील त्या उमेदवारांची महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूक करण्यास हरकत नाही.

(७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल एक महिन्यात संबंधित कार्यालयांना पाठवावा.

(८) आयुक्तांचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाला नाही तर संबंधित कार्यालयांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनतेने संबंधित उमेदवारास तात्पुरती नेमणूक द्यावी.

(९) ज्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांबाबत शंका उपस्थित झाली असेल अशा उमेदवारांच्याबाबतीत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी स्वतःच्या सहीने आपल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकारी यांना अ.शा. गोपनीय पत्राद्वारे कळवाव्यात व त्यांचा अहवाल ठराविक कालमर्यादेत मागवावा.

(१०) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी उपस्थित केलेल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांना मान्य असल्यास त्यांनी संबंधित प्रमाणपत्र रद्द करावे.

### (ब) मागासवर्गीय उमेदवारांची प्रमाणपत्रे व त्यांची तपासणी

(१) अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती(ब),भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यामधील महिलांनी त्यांच्या प्रवर्गातील महिला आरक्षणाच्या लाभाकरिता त्या त्या प्रवर्गात मोडत असल्याचे प्रमाणपत्र आदिवासी विकास विभाग , सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सादर करणे आवश्यक राहील व सदर प्रमाणपत्रे तपासण्याबाबत आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग यांनी जी कार्यपध्दती विहीत केली आहे तीच कार्यपध्दती अंमलात राहील.

### (क) मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर नियुक्ती झाल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे व त्याची तपासणी

(१) मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवार खुल्या प्रवर्गातील जागांकरीता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर झाल्यास, अशा महिला उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालील दोन विकल्प राहतील.

(अ) अशा महिला उमेदवारांनी सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी विहीत केल्याप्रमाणे त्यांच्या

संबधित जातीची प्रमाणपत्रे सादर करावीत व ती त्या विभागांनी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार तपासून घेण्यात यावीत. अशा महिला उमेदवारांकडून खुल्या प्रवर्गातील महिलाकरीता विहित केलेले क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

(ब) जर त्यां त्यांच्या संबधित जातीचे प्रमाणपत्र सादर करु इच्छित नसतील किंवा सादर करु शकत नसतील तर अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच या शासन निर्णयाच्या परिशिष्ट ३ नुसार विहित केलेले उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) या शासन निर्णयाच्या परीशिष्ट-२ नुसार संबंधित तहसिलदार/नायब तहसिलदार यांचेकडे क्रिमीलेअरच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

(२) वर नमुद केलेल्या उमेदवारांनी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास, तहसिलदार व नायब तहसिलदार यांनी अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गाप्रमाणेच उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र द्यावे.

(३)हे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतच्या अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना या शासन निर्णयाच्या परिशिष्ठ २ व ३ प्रमाणे राहील.

(४) वरील प्रमाणपत्र तपासण्यासाठी या शासन निर्णयाच्या परिच्छेद (दोन) (अ) मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

(तीन) हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

(चार) हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक. २९/१६-अ, दि. ३.४.२००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(चंद्रसेन तुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव.
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

पोलीस शिपाई भरती
सेवा प्रवेश नियमातील तरतुदी -
समांतर आरक्षण व सामाजिक
आरक्षण याबाबतच्या तरतुदींकडे लक्ष
वेधण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
परिपत्रक क्रमांक-एमआयएस-२००८/प्र.क्र.५१८/पोल-५ अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २९ ऑगस्ट, २००८.

## परिपत्रक

राज्यातील पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उणीवा राहू नयेत. तसेच सामाजिक व समांतर आरक्षणातील उमेदवारांना परिक्षेची समान संधी मिळून त्यांच्यावर अन्याय होऊ नये व पर्यायाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे सदर उमेदवारांनी धाव घेऊ नये यासाठी निवड प्रक्रियेसंबंधी अस्तित्वातील सेवा प्रवेश नियमातील तरतुदी व समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकातील तरतुदींकडे पोलीस भरती प्रक्रियेतील सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता शासन पोलीस भरती प्रक्रियेसंबंधी खालील विविध तरतुदींकडे पुन्हा लक्ष वेधत आहे :-

१) पोलीस शिपाई पदाच्या सेवा प्रवेश नियम २००६ मधील नियम ४ (२) (अ) मधील तरतुदीनुसार शारिरिक पात्रतेत किमान ५० टक्के गुण मिळवून १:१५ प्रमाणात उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी पात्र ठरवताना शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६ अ, दिनांक १६ मार्च, १९९९ मधील परिच्छेद-५ (अ) (ब) (क) मधील तीन टप्प्यांनुसार निवड करण्यात यावी.

२) सेवा प्रवेश नियम २००६ मधील नियम ४ (३) (अ) नुसार लेखी चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळविणा-या उमेदवारांना मुलाखत चाचणीसाठी बोलाविताना देखील शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-

एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६ अ, दिनांक १६ मार्च, १९९९ मधील परिच्छेद-५ (अ) (ब) (क) नुसार तीन टप्प्यांच्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

पोलीस भरती करताना वरीलप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६ मार्च, १९९९ च्या परिपत्रकातील तीन टप्प्याप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिल्यास तुलनेने कमी गुण प्राप्त झालेल्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना लेखी परिक्षेला बसण्याची/ मुलाखतीची संधी व जास्त गुण प्राप्त होऊनही समांतर आरक्षणातील/सामाजिक आरक्षणातील उमेदवारांना लेखी परिक्षेस १:१५ व मुलाखतीसाठी १:८ प्रमाणामुळे लेखी परीक्षा/मुलाखतीपासून वंचित रहावे लागणार नाही.

३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६ मार्च, १९९९ च्या परिपत्रकातील परिच्छेद-२ नुसार सेवेतील नियुक्तीसाठी सामाजिक आरक्षण (उभे आरक्षण) दिलेले असले तरी अनुसूचित जमातीची लोकसंख्या प्रामुख्याने जास्त असलेल्या ठाणे, नाशिक, धुळे, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली या आठ जिल्हयांसाठी वर्ग-३ व वर्ग-४ मधील सरळसेवा पदांच्या भरतीसाठी अनुसूचित जमातीसाठी ७ टक्यांपेक्षा वाढीव आरक्षण ठेवण्यात आले आहे व या जिल्हयांमध्ये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गाकरिता असलेले आरक्षण त्या-त्या प्रमाणात कमी करण्यात आलेले आहे. सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी याबाबत निर्गमित केलेले शासन निर्णय व त्यामधील तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-

| अ. क्र. | जिल्हे | अनु. जमाती साठी आरक्षण | इतर आरक्षण | | शासन निर्णय क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे, नाशिक आणि धुळे | २२ टक्के | अ.जा. - ८<br>वि.जा.(अ) - ३<br>भ.ज. (ब) - २.५<br>भ.ज. (क) - ३.५ | भ.ज. (ड) - २<br>वि.मा.प्र. - २<br>इ.मा.व. - ९<br>सर्वसाधारण - ४८ | बीसीसी-१०९३/२१६७/ सीआर-१४१/ ९३/१६ब दि.१ सप्टेंबर, १९९७ |
| २ | नंदुरबार | २२ टक्के | --"-- | --"-- | बीसीसी-१००८/ प्र.क्र. ११६/९८/१६ ब दि. २२/९/९९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | यवतमाळ | १४ टक्के | अ.जा. - ११<br>वि.जा.(अ) - ३<br>भ.ज. (ब) - २.५<br>भ.ज. (क) - ३.५ | भ.ज. (ड) - २<br>वि.मा.प्र. - २<br>इ.मा.व. - १४<br>सर्वसाधारण - ४८ | --"-- |
| ४ | रायगड | ९ टक्के | अ.जा. - ११<br>वि.जा.(अ) - ३<br>भ.ज. (ब) - २.५<br>भ.ज. (क) - ३.५ | भ.ज. (ड) - २<br>वि.मा.प्र. - २<br>इ.मा.व. - १९<br>सर्वसाधारण - ४८ | --"-- |
| ५ | चंद्रपूर | १५ टक्के | अ.जा. - १३<br>वि.जा.(अ) - ३<br>भ.ज. (ब) - २.५<br>भ.ज. (क) - ३.५ | भ.ज. (ड) - २<br>वि.मा.प्र. - २<br>इ.मा.व. - ११<br>सर्वसाधारण - ४८ | --"-- |
| ६ | गडचिरोल<br>ी | २४<br>टक्के | अ.जा. - १२<br>वि.जा.(अ) - २<br>भ.ज. (ब) - २<br>भ.ज. (क) - २ | भ.ज. (ड) - २.५<br>वि.मा.प्र. - १.५<br>इ.मा.व. - ६<br>सर्वसाधारण - ४८ | --"-- |

वर उल्लेखिलेल्या ८ जिल्हयांत पोलीस भरतीसाठी वरीलप्रमाणे आरक्षणानुसार पोलीस भरती करण्यात यावी. या वाढीव आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा अ.जा.,वि.जा.,भ.ज. व इ.मा.व. वर्गाकरिता असलेले आरक्षण त्या त्या प्रमाणात कमी करुन अनु.जमातीसाठी वाढीव आरक्षण देण्यात आले असल्यामुळे, त्या प्रवर्गाकरिता असलेल्या आरक्षणानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- बीसीसी-१००७/प्र.क्र.०२/०७/१६ ब दिनांक २९ मार्च, १९९९ अन्वये भरण्यात याव्यात. मात्र ७ टक्क्यापेक्षा कमी उमेदवार उपलब्ध झाल्यास ७ टक्के पर्यंतच्या मर्यादेतील अनुशेष विद्यमान आदेशाप्रमाणे पुढे ओढण्यात यावेत.

३. माजी सैनिकांना पोलीस शिपाई भरतीसाठी पोलीस महासंचालक यांच्या परिपत्रक क्र.प्रशिक्षण/पोलीस भरती/मार्गदर्शक तत्वे/९८,दिनांक ३०.९.१९९८ नुसार सूट देण्यात आलेली आहे. त्यानुसार मैदानी चाचणी/लेखी परिक्षा व तोंडी परिक्षा यापैकी जास्तीत-जास्त दोन परिक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी ५ टक्के गुणांची सूट देण्याबाबतची

सवलत शासनाच्या पत्र क्रमांक-एमआयएस-०३०२/सीआर-११०/पोल-५ अ, दिनांक १४ जानेवारी, २००५ नुसार पुढे चालू ठेवण्यात आलेली आहे.

४. प्रकल्पबाधित उमेदवारांसाठी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- न्यायप्र/१००८/७/प्र.क्र.५८/०८/(भाग-२)/१६ ब च्या दिनांक १८ जुलै, २००८ मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी/पुनर्वसन अधिकारी यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या जेष्ठता यादीतील उमेदवारांची नांवे मागवून पोलीसांच्या सेवा प्रवेश नियमानुसार त्यांची मैदानी चाचणी/लेखी परिक्षा/तोंडी परिक्षा घेऊन निवड करावयाची आहे. यापुढे प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेल्या पदांकरिता जाहीरात देण्याची आवश्यकता राहणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सदानंद जाधव )

उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

प्रत,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक,

सर्व पोलीस आयुक्त,

सर्व पोलीस अधीक्षक,

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये,

सामान्य प्रशासन विभाग (का.१६अ), मंत्रालय, मुंबई.

निवडनस्ती

********

प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना तसेच भूकंपग्रस्तांना शासकीय सेवेतील गट क व गट ड मधील पदांवर नियुक्ती देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :२७ ऑक्टोबर, २००९

**वाचा :**

१) शा.नि.,सा.प्र.वि., क्रमांक :एसआरव्ही-१०९४/१००४/प्र.क्र.३०/९४/१६-अ,दि. १७.११.९४
२) शा.प.,सा.प्र.वि.,क्रमांक:न्यायप्र-१००८/७/प्र.क्र.५८/०८/(भाग-२)/१६-अदि.१८.७.२००८
३) शा. नि. , सा.प्र.वि.,क्रमांक-भूकंप-१००८/प्र.क्र.१४५/२००८/१६-अ, दि.२७.१०.२००८.
४) शा.नि. , सा.प्र.वि.,क्रमांक-भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दि. २७.८.२००९.

**प्रस्तावना :-**

श्री.सुनिल एकनाथ पाटील उर्फ चौधरी प्रकल्पग्रस्त यांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र. ७४७२/२००७ दाखल केली होती. या याचिकेवर मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक ३१.३.२००८ रोजी मुख्यत्वे खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

अ) प्रकल्पग्रस्तांना ५ टक्के प्राथम्य कोटा ठेवला असल्यामुळे त्यांनी जाहिरातीला अनुसरुन खुल्या बाजारातील उमेदवारांप्रमाणे अर्ज करण्याची आवश्यकता नाही आणि खुल्या बाजारातील उमेदवारांशी स्पर्धा करण्याचीही आवश्यकता नाही. त्यांच्या नेमणूका संबंधीत पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार पात्रता तपासून व जिल्हाधिकारी/पुनर्वसन अधिकारी यांनी प्रकल्पग्रस्तांच्या ठेवलेल्या ज्येष्ठता यादीनुसार काटेकोरपणे परंतु कोणत्याही स्पर्धात्मक परिक्षेशिवाय करण्यात याव्यात.

ब) प्रतिवादी जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिनांक १७.८.२००७ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन प्रकल्पग्रस्तांशी संबंधित भरती केली असल्यास ती भरती रद्दबातल ठरविण्यात येत आहे.

वरील आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक १८ जुलै २००८ च्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक ३१.३.२००८ रोजी दिलेल्या वरील आदेशानुसार जिल्हाधिकारी जळगांव यांनी दिनांक १७.८.२००७ रोजी लिपिक-नि-टंकलेखक व तलाठी या पदासाठी दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन नियुक्त केलेल्या श्री. सचिन साहेबराव पाटील या प्रकल्पग्रस्त उमेदवाराच्या सेवा दिनांक ३१ जुलै २००८ च्या आदेशान्वये संपुष्टात आणल्या होत्या. त्यामुळे श्री.सचिन साहेब्राव पाटील यानी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र. ६१००/२००८ दाखल केली होती. सदर याचिका सुनावणीसाठी आली असता, मा.उच्च न्यायालयाने यापूर्वी वर नमूद केलेल्या याचिका क्र. ७४७२/२००७ प्रकरणात मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी दि.३१ मार्च २००८ रोजी दिलेले आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाशी विसंगत असल्याने या प्रकरणी निर्णय घेण्याकरीता पूर्ण खंडपीठ स्थापन करण्याची बाब मा.मुख्य न्यायाधीश यांचेकडे सोपविली.

पूर्ण खंडपीठाने याचिका क्रमांक ५२६६/२००८ सह याचिका क्रमांक ६१००/२००८ व याचिका क्रमांक ७१८५/२००८ वर एकत्रित सुनावणी घेऊन दिनांक ९ जुलै २००९ रोजी यापूर्वी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक ३१.३.२००८ रोजी दिलेल्या निर्णयात बदल करुन प्रकल्पग्रस्तांची भरती जाहिरात देऊन उमेदवाराची पात्रता तपासून स्पर्धापरिक्षेद्वारे गुणवत्तेच्या आधारे करण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर आदेशांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक १७.११.९४ च्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांना असलेल्या समांतर आरक्षणांतर्गतच भूकंपग्रस्तांनाही आरक्षण दिले होते व भूकंपग्रस्तांची देखिल ज्येष्ठता यादी प्रकल्पग्रस्तांप्रमाणेच जिल्हाधिकारी, लातुर व उस्मानाबाद यांचेकडे ठेवली होती. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांप्रमाणे भूकंपग्रस्तांची देखिल नियुक्ती स्पर्धा परीक्षा न घेता ज्येष्ठतेनुसार करण्याचा निर्णय दिनांक २७.१०.२००८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. तदनंतर संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णय दिनांक २७.८.२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

वर नमूद केलेल्या दिनांक ९.७.२००९ रोजी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या पूर्णपीठाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यासाठी प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्तीबाबत दिनांक १८.७.२००८ रोजी निर्गमित केलेले परिपत्रक रद्द करणे आवश्यक आहे.

तसेच वर नमूद केल्याप्रमाणे भूकंपग्रस्तांची पदभरतीदेखील ज्येष्ठतायादीनुसार होत असल्याने व ज्येष्ठतायादीनुसार प्रकल्पग्रस्तांना नियुक्ती देण्याचे आदेश मा. पूर्णपीठाने रद्द केल्याने भूकंपग्रस्तांच्या नियुक्त्या देखील जाहिरात देऊन उमेदवाराची पात्रता तपासून स्पर्धापरिक्षेद्वारे गुणवत्तेच्या आधारे करणे आवश्यक आहे. या शिवाय पूर्ण खंडपीठाने त्यांच्या आदेशामध्ये घटनेच्या अनुच्छेद १६ नुसार रोजगारासाठी समान संधी दिल्याची खात्री करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे यापूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्तीबाबत दिनांक १८.७.२००८ रोजी निर्गमित केलेले परिपत्रक व तसेच भूकंपग्रस्तांच्या नियुक्तीबाबत दिनांक २७.१०.२००८ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय रद्द करणे आवश्यक असून सुधारित आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

<u>शासन निर्णय :</u>

मा.उच्च न्यायालय औरंगाबाद पूर्ण खंडपीठाने (Larger Bench) दिलेल्या दिनांक ९.७.२००९ रोजीच्या निर्णयातील कार्यान्वयीन भाग सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-१ मध्ये दिलेला आहे. तो थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

" प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या जाहिरातीशिवाय व त्यांची सेवाप्रवेश अर्हता व गुणवत्ता डावलून करता येणार नाहीत. "

वरील निर्णयानुसार आता संदर्भाधीन क्रमांक २ येथील प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्तीबाबत निर्गमित केलेले दिनांक १८.७.२००८ रोजीचे परिपत्रक व संदर्भ क्र.३ येथील भूकंपग्रस्तांच्या नियुक्तीबाबत निर्गमित केलेला दिनांक २७.१०.२००८ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत असून प्रकल्पग्रस्तांच्या व

भूकंपग्रस्तांच्या नेमणूका जाहिरात देवून संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परीक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्यात याव्यात.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना तात्काळ द्याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९१०२७१७२०३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दि. रा. डिंगळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
शासकीय अभियोक्ता, उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती
* पत्राने

-------------

## परिशिष्ठ - एक

(शासन निर्णय क्रमांक : न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दिनांक २७.१०.२००९ चे सहपत्र)

" No doubt, that under the Government Circulars, the Collectors are also required to sponsor the names of eligible candidates to the recruitment authority.

However, since we have already held herein above, that the district-wise reservation is not permissible under the Constitution, the candidates from the other districts, who are project affected persons, would also be entitled to compete with the candidates who are sponsored by the Collector. In the absence of the advertisement, it will not be possible for them to get knowledge about recruitment process initiated in the areas beyond their district. We, therefore, find that in order to ensure the equality of opportunity which is guaranteed in the matter of employment under Article 16 of the Constitution, it would be necessary that the posts reserved for project affected persons are advertised so that all the eligible candidates can submit their applications and get an opportunity to compete with others in their category.

We accordingly answer the issue referred to us, as under :

" That, the project affected persons connot be appointed without advertising the posts ignoring their qualifications and merit."

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ मार्च २००५

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही. २०००/प्र.क्र. (१७/२०००)/बारा.— भारताचे संविधानातील अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे शासकीय विभागातील गट-अ, ब, क आणि ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " प्रतिज्ञापन " याचा अर्थ, शासकीय सेवेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने द्यावयाचे प्रतिज्ञापन, असा आहे ;

(ख) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ग) " सेवा " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील नागरी सेवा किंवा इतर कोणतीही सेवा, असा आहे ;

(घ) " लहान कुटुंब " याचा अर्थ, दोन मुले यांसह पत्नी व पती असा आहे ;

**स्पष्टीकरण.**----या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) एखाद्या जोडप्यास हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकाला किंवा त्यानंतर केवळ एकच मूल असेल त्याबाबतीत, नंतरच्या एकाच प्रसूतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल,

(दोन) " मूल " यामध्ये दत्तक मुलाचा किंवा मुलांचा समावेश होत नाही,



[ **किंमत** : रुपये ५.०० ]

(तीन) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु, व्याख्या न केलेल्या शब्द व शब्दप्रयोग यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

३. **लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाची आवश्यकता.**—शासकीय सेवेतील गट अ, ब, क किंवा ड मधील पद भरतीचे विनियमन करण्याच्या बाबतीत करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश किंवा विलेख किंवा त्याबाबत करण्यात आलेले इतर कोणतेही आदेश किंवा विलेख यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ही, कोणत्याही शासकीय सेवेतील गट-अ, गट-ब, गट-क किंवा गट-ड मधील पदाच्या नियुक्तीसाठी एक अतिरिक्त अत्यावश्यक अट असेल :

परंतु, हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकास दोनापेक्षा अधिक मुले असणाऱ्या व्यक्तीस, अशा अंमलबजावणीच्या दिनांकास असलेल्या तिच्या मुलांच्या संख्येत जोपर्यंत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडाखाली, नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसूतीमध्ये जन्मलेले मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या अनर्हतेच्या प्रत्योजनासाठी विचारात घेण्यात येणार नाही,

४. **प्रतिज्ञापन सादर करणे.**—शासकीय सेवेतील गट अ, ब, क किंवा ड मधील कोणत्याही पदासाठी अर्ज करण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, अर्जासोबत या नियमांतील नमुना " अ " मधील प्रतिज्ञापन सादर करील,

५. **नियम लागू नसणे.**—जेथे निवड प्रक्रिया हे नियम अमलात येण्याच्या दिनांकापूर्वीच सुरू झाली असेल त्याबाबतीत हे नियम लागू करण्यात येणार नाहीत.

६. **या नियमांच्या तरतुदी शिथिल करण्याचा अधिकार.**—या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, शासनास, न्याय्य आणि संयुक्तिक वाटेल अशा परिस्थितीत आणि अशा रितीने शिथिलतेची कारणे लेखी नोंदवून या नियमातील कोणत्याही तरतुदी शिथिल करता येतील.

## प्रतिज्ञापन

नमुना-" अ "

(नियम ४ पहा)

मी, श्री./श्रीमती/कुमारी ........................................................................ ,

श्री. ............................................................ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी,

वय ............. वर्षे, राहणार ........................................................................

यांद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

(१) मी ........................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला .................. (संख्या ) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक ....................................................... यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....................... आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक .................................. नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : (सही)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. कृ. लोखंडे,**

शासनाचे उप सचिव.

क्रमांक एसआरव्ही. २०००/प्र.क्र. (१७/२०००)/बारा,

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक २८ मार्च २००५.

प्रति—

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

मुख्य सचिव,

सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

सर्व मंत्रालयीन विभाग

*प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई,

*राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,

*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,

*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,

*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,

*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई, (२ प्रती प्रसिद्धीकरिता)

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी,

सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

निवड नस्ती.

---

*पत्राने.

**बा. बा. नारायणकर,**
शासनाचे अवर सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 28th March 2005.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. SRV. 2000/CR (17/2000)/XII.—In exercise of the powers conferred by the proviso to the article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules prescribing declaration of the small family as one of the essential qualification for recruitment to Group A, B, C and D posts in Government Department, namely :—

1. *Short title*.—These rules, may be called the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005.

2. *Definitions*.—In these rules, unless the context otherwise requires ,—

(*a*) " Declaration " means a declaration to be given by the candidate applying for Government service ;

(*b*) " Government " means the Government of Maharashtra;

(*c*) " Service " means Civil Service or any other service under Government of Maharashtra ;

(*d*) " Small family " means wife and husband including two children.

*Explanation*.—For the purposes of this clause,—

(*i*) Where a couple has only one child on or after the date of such commencement, any number of children born out of a single subsequent delivery shall be deemed to be one entity ;

(*ii*) " Child " dose not include an adopted child or children.

(*iii*) Words and expressions used in these rules but not defined shall have the same meaning respectively assigned to them in the Maharashtra Civil Service Rules.

3. *Necessity of declaration of Small Family*.—Notwithstanding any things contained in any rules or orders or instruments made in that behalf, regulating recruitment to Group A, B, C or D post in Government Service or any other order or instruments made in that behalf, the declaration of Small Family shall be an additional essential requirement for an appointment to Group A, Group B, Group C or Group D post in any Government service :

Provided that, a person having more than two children on the date of commencement of these rules shall not be disqualified for appointment

under these clause so long as the number of children he had on the date of such commencement dose not increase :

Provided further that a child or more than one child born in a single delivery within the period of one year from the date of such a commencement shall not be taken into consideration for the purpose of disqualification mentioned in this clause.

4. *Submission of declaration.*—A person who desires to apply for any post in Group A, B, C or D in any Government Service shall submit, alongwith the application form, a declaration in FORM ' A ' appended to these rules.

5. *Rules not to apply.*—These rules shall not be made applicable where the selection process was started before the date of commencement of these rules.

6. *Power to Relax the Provisions of these Rules.*—Notwithstanding anything contained in these rules, Government may relax the provisions of any of these rules, under such circumstances in such manner as shall appear it to be just and reasonable and shall record the reasons for any such relaxation.

under these clause so long as the number of children he had on the date of such commencement dose not increase :

Provided further that a child or more than one child born in a single delivery within the period of one year from the date of such a commencement shall not be taken into consideration for the purpose of disqualification mentioned in this clause.

4. *Submission of declaration.*—A person who desires to apply for any post in Group A, B, C or D in any Government Service shall submit, alongwith the application form, a declaration in FORM ' A ' appended to these rules.

5. *Rules not to apply.*—These rules shall not be made applicable where the selection process was started before the date of commencement of these rules.

6. *Power to Relax the Provisions of these Rules.*—Notwithstanding anything contained in these rules, Government may relax the provisions of any of these rules, under such circumstances in such manner as shall appear it to be just and reasonable and shall record the reasons for any such relaxation.

# DECLARATION

## FORM-A

(*See* Rule 4)

I, Shri/Smt./Kum. ..........................................................................................
son/daughter/wife of Shri ............................................................................, aged
....................... years, resident of ..........................................................................
..........................................................................................................................
do hereby declare as follows :—

1. That I have filled my application for the post of ...........................

2. I have ................................. (Number) living children as on today. Out of which No. of children born after.................... is ........... (mention dates of birth, if any).

3. I am aware that, if any total number of living children are more than two due to the children born after......................................................, I am liable to be disqualified for the same post.

Place :

Date : (Signature)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. K. LOKHANDE,
Deputy Secretary to Government.

No. SRV. 2000/CR (17/2000)/XII,
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Mantralaya, Mumbai 400 032,
Dated the 28th March 2005.

Copy forwarded with compliments to—

The Secretary to the Governor, Raj Bhavan, Malbar Hill, Mumbai,

The Principal Secretary to the Chief Minister,

The Principal Secretary to the Deputy Chief Minister,

The Private Secretary to all Ministers/State Ministers,

The Chief Secretary,

All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/ Secretaries of Mantralaya Departments.

All Mantralaya Departments,

Registrar, High Court (Original Side), Mumbai,

The Registrar High Court (Appellate Side), Mumbai,

The Registrar Office of the Loka Ayukta and Upa-Loka Ayukta, Mumbai,

The Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai,

*The Principal Secretary, Maharashtra Legislature Assembly, Mumbai,

*The Principal Secretary, Maharashtra Legislature Council, Mumbai,

*The State Election Commissioner, Election Commission Office, New Administrative Bldg., Mumbai,

*Accountant General, Maharashtra-1 (Account & Examination), Maharashtra, Mumbai,

*Accountant General, Maharashtra-1 (Account & Treasury), Maharashtra, Mumbai,

*Accountant General, Maharashtra-2 (Account & Examination), Maharashtra, Nagpur,

*Accountant General, Maharashtra-2 (Account & Treasury), Maharashtra, Nagpur,

Director General of Information and Public Relations, Mumbai (2 copies for publicity),

Pay and Accounts Officer, Mumbai,

Resident Audit Officer, Mumbai,

All Divisional Commissioners,

All Collectors,

All Chief Executive Officers of Zilla Parishads,

All District Treasury Officers,

Heads of Departments and Heads of Offices under the All Departments of Mantralaya.

All Desks of General Administration Department,

Select File,

*By Letter.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. B. NARAYANKAR,
Under Secretary to Government.

गोपनीय

उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य याची पडताळणी करण्यासंबंधात.....

साक्षांकन नमुन्यातील मराठी भाषांतर सुधारित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : चापअ-१००८/प्र.क्र.५७/२००८/१६अ

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक : ३०.९.२००८.**

**संदर्भ :-** १) शासन परिपत्रक, राजकीय व सेवा विभाग, क्रमांक - १७२४/३४, दि. २०.१०.१९४८,

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - व्हीसीए-१०६०/डी, दि. २७.९.१९६०,

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - व्हीसीए-१०६८/डी-१, दि. १०.५.१९६८,

४ )शासन परिपत्रक, क्रमांक - चापअ-१००१/प्र.क्र.११०/२००१/१६अ, दि. २६.११.२००२.

**प्रस्तावना :-**

शासन सेवेत नियुक्ती करण्यापूर्वी उमेदवाराचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य यांची तपासणी करुन ते सदोष नाहीत याची खात्री करुन घेण्याची आवश्यकता, याबाबतच्या सूचना संदर्भाधिन क्र. १ च्या आदेशात स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. उमेदवाराची गट-क आणि गट-ड च्या पदावर नेमणूका करण्यापूर्वी / नेमणूकीनंतर चारित्र्य व पूर्वचारित्र्य याची तपासणी करण्याबाबतच्या सूचना संदर्भाधीन क्र. २ च्या आदेशान्वये देण्यात आलेल्या आहेत. गट-अ आणि गट-ब च्या पदावर नेमणूका करण्यापूर्वी संबंधित उमेदवाराची चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी आवश्यक असून त्यांच्या देखिल चारित्र्य व पूर्वचारित्र्य यांची तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

२. राज्य शासनांतर्गत पदावर नियुक्त करावयाच्या व्यक्तीचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य यांची तपासणी करण्यासाठी उमेदवारांनी भरुन द्यावयाचा साक्षांकन नमुना संदर्भाधीन क्र. ३ च्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आला आहे. या साक्षांकन नमुन्यात संदर्भाधीन क्र. ४ च्या परिपत्रकान्वये रकाना, क्र.११ (क) नव्याने समाविष्ट करुन सुधारित साक्षांकन नमुना निर्गमित करण्यात आला होता. आता महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्रमांक ३६३/२००६ यावर दिनांक ५.१०.२००७ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये साक्षांकन नमून्यातील रकाना ११(अ) मधील मराठी व इंग्रजी भाषेमध्ये विचारण्यात आलेली माहिती वेगळी असल्याचे नमूद केले आहे. सबब मराठी अनुवाद भाषा संचालनालयाकडून तपासून घेण्यात येवून त्यात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

शासनांतर्गत पदांवर नेमणुका करताना उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत उमेदवारांनी भरुन द्यावयाच्या साक्षांकन नमुन्यातील सर्व इंग्रजी मजकुराचा मराठी अनुवाद सुधारित करण्यात येऊन सोबत सुधारित साक्षांकन नमुना जोडला आहे.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वरील सुधारणेनुसार तयार करण्यात आलेला सुधारीत साक्षांकन नमुना त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख यांच्या निदर्शनास आणावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( त्रि. वा. गेडाम )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

D:\cabinet/cabinet-16-4-08/10

ROTA/H-2063(5000-9-2008)-1

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव

२. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव

३. उपमुख्यमंत्र्याचे सचिव

४. मुख्य सचिव

५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

६. सह सचिव / उप सचिव (आस्थापना), सर्व मंत्रालयीन विभाग

७. सह सचिव, विधी व न्याय विभाग / का.३, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

८. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,

९. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

१०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,

११. प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,

१२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

१३. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई

१४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

१५. सर्व विभागीय आयुक्त,

१६. सर्व जिल्हाधिकारी,

१७. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

१८. सामान्य प्रशासन विभागातील सर्व आस्थापना विषयककार्यासने (का.१९-अ मार्फत)

**१९. निवड नस्ती.**

## साक्षांकन नमुना ATTESTATION FORM

१. **इशारा-** या साक्षांकन नमुन्यामध्ये खोटी माहिती पुरविणे किंवा वस्तुस्थितीनिदर्शक माहिती दडपून ठेवणे ही अनर्हता ठरेल आणि त्यामुळे उमेदवार सरकारी नोकरीस अपात्र ठरेल.

1. **Warning.**- The furnishing of false information or suppression of any factual information in the Attestation Form would be disqualification and is likely to render the candidate unfit for employment under the Government.

२. हा नमुना पूर्ण केल्यानंतर आणि सादर केल्यानंतर, उमेदवार स्थानबध्द, सिध्ददोष, सेवारोधित, इत्यादि झाला असेल तर, यथास्थिति महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे किंवा यापूर्वी ज्यांच्याकडे साक्षांकन नमुना पाठविला असेल त्या प्राधिका-याकडे, त्याबाबतचा तपशील ताबडतोब कळविला पाहिजे. असे करण्यास कसूर केल्यास वस्तुस्थितीनिदर्शक माहिती दडपून ठेवली आहे असे समजण्यात येईल.

2. If detained, convicted, debarred, etc., subsequent to the completion and submission of this form, the details should be communicated, immediately, to the Maharashtra Public Service Commission or the authority to whom the attestation form has been sent earlier, as the case may be. Failure to do so will be deemed to be suppression of factual information.

३. जर कोणत्याही वेळी, एखाद्या व्यक्तीने या साक्षांकन नमुन्यामध्ये खोटी माहिती पुरविली आहे किंवा वस्तुस्थितीनिदर्शक माहिती दडपून ठेवली आहे असे त्या व्यक्तीच्या सेवाकाळामध्ये निदर्शनास आले तर त्याची सेवा समाप्त होण्यास तो पात्र ठरेल.

3. If the fact that false information has been furnished or that there has been suppression of any factual information in the attestation form, comes to notice at any time, during the service of a person, his service would be liable to be terminated.

---

| | | |
|---|---|---|
| १. संपूर्ण नाव (ठळक अक्षरात), टोपण नावे असल्यास त्यासह (कोणत्याही वेळी तुम्ही तुमच्या नावातील किंवा आडनावातील कोणताही भाग गाळला असल्यास किंवा त्यात भर घातली असल्यास, त्याचा निर्देश करावा.) | आडनाव ________ | नाव ________ |
| 1. Name in full (in block capitals)with aliases, if any (Please indicate if you have added or dropped at any stage any part of your name or surname). | Surname ........ | Name ........ |
| २. सध्याचा संपूर्ण पत्ता (म्हणजेच गाव, ठाणे व जिल्हा किंवा घर क्रमांक, गल्ली/मार्ग/रस्ता आणि शहर). | ________ | |
| 2. Present address in full (i.e. Village, Thana and District or House Number, Lane/Street/Road and Town). | ........ | |
| ३. (अ) घरचा संपूर्ण पत्ता (म्हणजेच गाव, ठाणे व जिल्हा किंवा घर क्रमांक, गल्ली/मार्ग/रस्ता आणि शहर) | ________ | |
| 3. (a) Home address in full (i.e. Village, Thana and District or House Number, Lane/Street/Road and Town). | ........ | |
| (ब) पाकिस्तानातील मूळ रहिवासी असल्यास, त्या देशातील पत्ता आणि भारतीय संघराज्यात स्थलांतर केल्याचा दिनांक | ________ | |
| (b) If originally a resident of Pakistan, the address in that country and the date of migration to the Indian Union. | ........ | |

४. मागील ५-वर्षांत एकावेळी, १ वर्षाहून अधिक काळापर्यंत ज्या ठिकाणी तुम्ही राहिला असाल त्या ठिकाणाचा तपशील (निवासाच्या कालावधीसह), परदेशात (पाकिस्तानासह) वास्तव्य झाले असल्यास, वयाची २१ वर्ष पूर्ण झाल्यानंतर ज्या ठिकाणी १ वर्षाहून अधिक काळापर्यंत राहिला असाल त्या सर्व ठिकाणाचा तपशील द्यावा.

4. Particulars of places (with periods of residences) where you have resided for more than one year at a time during the preceding five years. In case of stay abroad (including Pakistan) particulars of all places where you have resided for more than one year after attaining the age of 21 years should be given.

| कालावधी / Period<br>पासून/ From पर्यंत/ To | संपूर्ण निवासी पत्ता (म्हणजे गाव, ठाणे व जिल्हा किंवा घर क्रमांक, गल्ली/मार्ग/रस्ता आणि शहर)<br>Residential address in full (i.e. Village, Thana and District or House Number, Lane/Street/ Road and Town). | मागील स्तंभात उल्लेखिलेल्या ठिकाणाच्या जिल्हा मुख्यालयाचे नाव<br>Name of the District Head Quarter of the place mentioned in the preceding Column |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

५. वडिलांचे --(अ)संपूर्ण नाव, टोपण नाव असल्यास त्यासह. (अ)____________________

5. **Father's**--(a) Name in full with aliases if any (a) ..............................................

(ब) सध्याचा डाक पत्ता (हयात नसल्यास, अखेरचा पत्ता द्यावा.) (ब) ____________________

(b) Present postal address (if dead give last address). (b) ..............................................

(क) घरचा कायम पत्ता (क)____________________

(c) Permanent home address (c) ..............................................

(ड) व्यवसाय (ड)____________________

(d) Profession (d)..............................................

(इ )सेवेमध्ये असल्यास पदनाम व कार्यालयीन पत्ता द्यावा. (इ) ____________________

(e) If in service give desgination and official address. (e) ..............................................

६. (१) खालील व्यक्तींचे राष्ट्रीयत्व

6. (i) Nationality of---

(अ) वडील (अ)____________________

**(a) Father** (a) ..............................................

(ब) आई (ब)____________________

(b) Mother (b)..............................................

(क) पती/पत्नी (क) ____________________

(c) Husband/wife (c) ..............................................

(ड) उमेदवार (ड) ____________________

(d) Candidate (d) ..............................................

(२) पतीचे/पत्नीचे जन्मस्थान ____________________

(2) Place of birth of Husband/Wife ..............................................

७. (अ) निश्चित जन्मदिनांक (अ) ____________________

(a) Exact date of brith (a) ..............................................

(ब) सध्याचे वय | (ब) ____________________
(b) Present age | (b) ....................................................
(क) मॅट्रीक परीक्षेच्या वेळचे वय | (क) ____________________
(c) Age at Matriculation | (c)....................................................

८. (अ) जन्मठिकाण, ते जेथे असेल तो जिल्हा व राज्य | (अ) ____________________
(a) Place of brith, district and State in which situated. | (a)....................................................
(ब) तुम्ही कोणत्या जिल्हयातील व राज्यातील आहात? | (ब) ____________________
(b) District and State to which you belong ? | (b) ....................................................

९. शैक्षणिक अर्हता, वयाच्या १५ व्या वर्षापासून शिक्षणाची ठिकाणे व शाळेतील व महाविद्यालयातील वर्षे यासह.

9. Educational qualifications showing place of education with years in schools and collages since the 15th years of age.

| शाळेचे/महाविद्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता Name of school/college with full address | प्रवेश दिनांक Date of entering | सोडल्याचा दिनांक Date of leaving | उत्तीर्ण परीक्षा Examination passed |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

१०. (अ) जर तुम्ही यापूर्वी नोकरी करीत असाल तर तपशील द्यावा.
10. (a) If you have any time employed, give details.

| धारण केलेले पदनाम किंवा कामाचे वर्णन Desigination or post held or description of work | कालावधी Period | | कार्यालयाचा/भागीदारी संस्था किंवा संस्थेचा पत्ता Full address of the Office/firm or institution | पूर्वीची नोकरी सोडण्याची संपूर्ण कारणे Full reasons for leaving the previous service |
|---|---|---|---|---|
| | पासून From | पर्यंत To | | |
| | | | | |
| | | | | |

१०.(ब) जर यापूर्वीची नोकरी भारत सरकार/ राज्य शासन/ भारत सरकार किंवा राज्य शासन यांच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील उपक्रम/ स्वायत्त संस्था/ विद्यापीठ स्थानिक मंडळ यामधील असेल तर/ ती नोकरी सोडण्याची/ किंवा समाप्त होण्याची संपूर्ण कारणे द्या. तुच्याविरुध्द शिस्तभंगाची काही कार्यवाही सुरु करण्यात आली होती काय किंवा जेव्हा तुम्ही सेवासमाप्तीची नोटीस दिली त्यावेळी, किंवा त्यानंतर तुमच्या सेवा प्रत्यक्षपणे समाप्त करण्यात येण्यापूर्वी तुम्हाला कोणत्याही बाबतीत तुमच्या वर्तणुकीबद्दल स्पष्टीकरण देण्यासाठी फर्माविण्यात आले होते काय ?

10. (b) If the previous employment was under the Government of India/a State Government /an undertaking owned or controlled by the Government of India or a State Government/an autonomuos body/University/Local body,please State fully the reasons for leaving/termination of that appointment. Whether any disciplinary proceedings framed against you or had you been called upon to explain your conduct in any matter at the time you gave notice of termination of service or at a subsequent date before your services were actually terminated ?

११. (अ) तुम्हाला, आजपर्यंत कधीही अटक करण्यात / तुमच्याविरुध्द खटला दाखल करण्यात / स्थानबध्द करण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही अपराधाबद्दल, न्यायालयाकडून बध्द करण्यात / दंड करण्यात / दोषसिध्द ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही लोकसेवा आयोगाकडून त्याच्या परीक्षांना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय / निवडीसाठी अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्याची मनाई करण्यात आली आहे काय / काढून टाकण्यात आले आहे काय ?

11. (a) Have you ever been arrested/ prosecuted/ kept under detention, or bound down/fined/convicted by a court of law for any offence or debarred / disqualified by any Public Service Commission from appearing at its examinations/selections or debarred from taking any examination/rusticated by any University or any other educational authority/Institution ?

११. (ब) हा साक्षांकन नमुना भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत तुमच्याविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ?

11. (b) Is any case pending against you in any court of law, University or any other educational authority/Institution at the time of filling up this attestation form ?

११. (क) आपल्या विरुध्द कोणत्याही न्यायालयात फौजदारी खटला सुरु आहे किंवा कसे, सुरु असल्यास त्याचा प्रकरण क्रमांक, कोणत्या न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे, व कोणत्या कलमाखाली इत्यादि तपशील.

11. (c) Whether he/she is facing any criminal prosecution in any court and if yes to state details thereof such as case number, in which court the case is pending under which section, etc.,

[ (अ), (ब) किंवा (क) चे उत्तर "होय" असेल तर हा नमुना भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादिंचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय/विद्यापीठ/शैक्षणिक प्राधिकरण इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणाचे स्वरुप स्पष्ट करावे.]

[ If the answer to (a) or (b) or (c) is 'Yes' fill particulars of the case, arrest, detention, fine, conviction, sentence, etc. and the nature of the case pending in the Court/University/Educational authority etc., at the time of filling up this form should be given.]

**(टिप.- तसेच या साक्षांकन नमुन्याच्या सुरुवातीस असलेला "इशारा" देखील कृपया पहा.)**
(Note.- Please also see the 'Warning'at the top of this Attestation Form)

| | |
|---|---|
| १२. (अ) तुम्ही विवाहीत आहात काय ? असल्यास-- | (अ)________ |
| (a) Are you married ? If so- | (a) .......... |
| (ब) तुम्हाला एकापेक्षा अधिक पत्नी आहेत काय ? असल्यास, त्यांची नांवे काय आणि तुम्ही त्यांच्याशी केव्हा विवाह केला ? | (ब )________ |
| (b) Have you more than one wife ? If so, what are their names and when did you marry them ? | (b) .......... |
| (क) तुमच्या पतीस एकापेक्षा अधिक पत्नी आहेत काय ? असल्यास त्यांची नावे काय आणि त्याने त्यांच्याशी केव्हा विवाह केला ? | (क)________ |
| (c) Has your husband more than one wife and if so, what are their names and when did he marry them ? | (c).......... |
| १३. तुमच्या निवास भागातील दोन जबाबदार व्यक्तींची नावे किंवा ज्यांना तुम्ही माहीत आहात अशा दोन संदर्भी व्यक्तींची नावे. | (१).......... (२) .......... |
| 13. Names of two responsible persons of your locality or two references to whom you are known. | (1) .......... (2) .......... |

मी असे प्रमाणित करतो की, पूर्ववर्ती माहिती माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे अचूक आणि संपूर्ण आहे. सरकारी नोकरीसाठी असणा-या माझ्या पात्रतेस हानी पोचवील अशी कोणतीही परिस्थिती असल्याचे मला माहीत नाही.

ठिकाण-----------

दिनांक ------------

उमेद्वाराची सही.

I certify that the foregoing information is correct and complete to the best of my knowledge and belief, I am not aware of any circumstances which might impair my fitness for employment under Government.

Place.........................

Signature of the Candidate.

Date.........................

# ओळख प्रमाणपत्र IDENTITY CERTIFICATE

(खालीलपैकी एका व्यक्तीची या प्रमाणपत्रावर सही असावी) :-

**( This certificate is to be signed by any one of the following) :-**

एक) राज्य किंवा केंद्र शासनाचे राजपत्रित अधिकारी ;

**i) Gazetted Officers of the State or Central Government ;**

दोन) संसद किंवा राज्य विधानमंडळाचे सदस्य ;

**ii) Members of the Parliament or State Legislature ;**

तीन) उपविभागीय दंडाधिकारी/अधिकारी ;

**iii) Sub-Divisional Magistrates/Officers ;**

चार) मामलेदार, तहसिलदार, किंवा दंडाधिका-याच्या शक्ती वापरण्यास प्राधिकृत केलेले नायब/उप तहसिलदार ;

**iv) Mamlatdars, Tahsildars or Naib/Deputy Tahsildars authorised to exercise magisterial powers ;**

पाच) सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे आणि किंवा माध्यमिक शाळांचे प्राचार्य/मुख्याध्यापक :

**v) Principals and Head Masters of all recognised Colleges and/or Secondary Schools ;**

सहा) पोस्ट मास्तर

vi) Post Masters.

प्रमाणित करण्यात येते की, श्री...................................................यांचा/ची मुलगा/मुलगी/पत्नी, श्री./श्रीमती/कुमारी ..........................................यांना मी गेली ......................वर्ष ...................महिने ओळखत आहे आणि माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे त्यांनी दिलेला तपशील बरोबर आहे.

ठिकाण.................. (सही)..............................

दिनांक ..................... ( पदनाम किंवा दर्जा आणि पत्ता )

Certified that I have known Shri/Shrimati/Kumari.................................................................. son/daughter/wife of Shri..................................................for the last.........................................years .........................Months and that to the best of my knowledge and belief particulars furnished by him/her are correct.

Place........................... Signature..................................

Date............................ (Designation or Status and address)

---

(कार्यालयाने भरावयाचे ) (To be filled in by the office)

(१) नियुक्ती प्राधिका-याचे नाव, पदनाम आणि संपूर्ण पत्ता ..................................................

(i) Name, designation and full address of the ........................................................ appointing authority.

(२) ज्यासाठी उमेदवाराचा विचार करण्यात येत आहे ते पद .........................................

(ii) Post for which the candidate is being ................................ considered.

------------

D:\cabinet/cabinet-16-4-08/17
H-2063 -4a.

## गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जून २०११

### आदेश

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१.**

क्रमांक आरसीटी-०३११/प्र.क्र.२२८/पोल-५अ.—मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम-५(ब) आणि त्या अनुषंगाने प्रदान करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि या संदर्भात अस्तित्वात असलेले पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २००६ अधिक्रमित करुन याव्दारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील " पोलीस शिपाई " या पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे, जसे :—

१. या नियमांना महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " विभाग " म्हणजे शासनाचा गृह विभाग;

(ब) " महासंचालक " म्हणजे पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई;

(क) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन;

(ड) " पोलीस दल " म्हणजे मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम-३ अन्वये विहित करण्यात आलेले पोलीस दल.

३. (१) पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदावरील निवडीसाठी उमेदवारांकडे खालील नमूद वय, शैक्षणिक व शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे :—

(अ) वय.—कमीत कमी १८ वर्षे जास्तीत २५ वर्षे *(मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासनाने वेळोवळी ठरविलेल्या धोरणानुसार उच्चत्तम वयोमर्यादत सूट देय राहिल.)*

(ब) शैक्षणिक अर्हता.—महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा. अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(क) शारीरिक पात्रता.—

| | महिलांकरिता | पुरुषांकरिता |
|---|---|---|
| (*i*) उंची .. | १५५ सें.मी.पेक्षा कमी नसावी. | १६५ सें.मी.पेक्षा कमी नसावी. |
| (*ii*) छाती .. | .... | न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. |

**(२) शैक्षणिक व शारीरिक पात्रतेत द्यावयाची सूट**

(अ) नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद.—

(अ) शैक्षणिक अर्हता.—शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलवादीविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांची मुले असलेले उमेदवार जे इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीण झालेले आहेत ते भरती करता पात्र ठरतील. मात्र असे उमेदवार नक्षलग्रस्त भागाच्या बाहेर बदलीसाठी पात्र असणार नाहीत.

(ब) शारीरिक पात्रता.— शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलवादीविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार अथवा पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी याच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारीरिक पात्रता शिथिल करण्यात येईल :-

(*i*) उंची : २.५ सें.मी.महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(*ii*) छाती : छातीच्या मोजमापाची आवश्यकता नाही.

(क) या नियमातील उप खंड (अ) व (ब) नुसार विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता व शारीरिक पात्रता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत शिथिल करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

(ड) शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील पोलीस भरतीच्या वेळी स्थानिक आदिवासी भागात बोलली जाणारी बोली भाषा (Local Tribal dialect) अवगत असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

(ब) पोलीस बँड.—

(अ) शैक्षणिक अर्हता.— बँड पथकासाठी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा उत्तीर्ण.

(ब) शारीरिक पात्रता.— बँड पथकाच्या भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या बाबतीत या नियमाच्या उपनियम (१) च्या खंड (क), उपखंड (i) व (ii) मध्ये विहित केलेल्या शारीरिक पात्रतेमध्ये खालीलप्रमाणे सवलत देण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील :—

(*i*) उंची : २.५ सें.मी.

(*ii*) छाती : २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून.

(क) अनुभव व इतर अटी.— (*i*) बँड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बँड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहिल.

(*ii*) पोलीस बँड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठित करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बँड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

(*iii*) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयातील अन्य कर्तव्यही बजावणे आवश्यक राहिल.

(*iv*) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बँड पथकात बदलीस पात्र ठरतील.

***(क) खेळाडू प्रवर्ग.***— आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पुरुष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ सें.मी. इतकी सूट देय राहिल.

***(ड) पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियाबाबत.***— पोलीस दलातील बेपत्ता कर्मचारी किंवा असाध्य रोगामुळे किंवा अन्य कारणांमुळे वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या एकाच पात्र नातेवाईकास पोलीस भरतीसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारीरिक पात्रता शिथिल करण्यात येईल :—

(अ) उंची : २.५ सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(ब) छाती : २ सें.मी. न फुगविता व १.५ सें.मी. फुगवून पुरुष उमेदवारांसाठी.

**खुलासा.**— पात्र नातेवाईक यामध्ये पोलीस कर्मचाऱ्याच्या खालील कुटुंबियांचा समावेश आहेत

(अ) पती/पत्नी, मुलगा, अविवाहीत मुलगी

(ब) अविवाहीत पोलीस कर्मचाऱ्याच्या बाबतीत सर्वस्वी अवलंबून असणारा अविवाहीत भाऊ अथवा बहिण

(क) मृत पोलीस कर्मचाऱ्याचा मुलगा हयात नसेल तर त्याची सून

४. **(१) शारीरिक चाचणी (१०० गुण).**— जे उमेदवार विहित शारीरिक व शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत असतील अशा उमेदवारांना शारीरिक चाचणी द्यावी लागेल. शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण १०० गुणांची असेल.

(अ) पुरुष उमेदवार

| | | |
|---|---|---|
| (अ) ५ कि.मी.धावणे | .. | २० गुण |
| (ब) १०० मी.धावणे | .. | २० गुण |
| (क) गोळा फेक | .. | २० गुण |
| (ड) लांब उडी | .. | २० गुण |
| (ई) १० पुल अप्स | .. | २० गुण |
| एकूण | .. | १०० गुण |

**(ब) महिला उमेदवार**

| | | |
|---|---|---|
| (अ) ३ कि.मी.धावणे | .. | २५ गुण |
| (ब) १०० मी.धावणे | .. | २५ गुण |
| (क) गोळा फेक (४ कि.ग्रॅ.) | .. | २५ गुण |
| (ड) लांब उडी | .. | २५ गुण |
| एकूण | .. | १०० गुण |

**(२) लेखी चाचणी (१०० गुण).**—

(अ) जे उमेदवार शारिरिक पात्रता चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवून पूर्ण करतील त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना १०० गुणांच्या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल.

(ब) लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल :—

(*i*) अंकगणित

(*ii*) सामान्यज्ञान व चालू घडामोडी

(*iii*) बुद्धीमत्ता चाचणी

(*iv*) मराठी व्याकरण

(क) लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील.

***स्पष्टीकरण.***— जे उमेदवार शारीरिक पात्रता चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवून पूर्ण करतील त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल. उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील १५० (१५ x १० = १५०) उमेदवार व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ७५ (१५ x ५ = ७५) उमेदवार लेखी चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे १५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढया अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत लेखी चाचणीसाठी पात्र असतील. तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ७५ व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढया अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळाले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत लेखी चाचणीसाठी पात्र असतील.

(३) महासंचालकांनी प्रत्येक पोलीस घटकासाठी गठित केलेले निवड मंडळ या नियमाच्या पोटनियम (१) व (२) मध्ये नमूद केलेल्या दोन निकषांवरुन प्राप्त एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करील. शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये प्राप्त होणारे गुण एकत्र केल्यानंतर, उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/ १६-अ, दिनांक १६ मार्च १९९९ च्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या टप्प्यानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करण्यात येईल.

५. **चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी.**—पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारांचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय या उमेदवारांची नियुक्ती करण्यात येऊ नये तसेच त्यांना प्रशिक्षणासाठीही पाठविण्यात येऊ नये. ज्या उमेदवारांविरुद्ध गुन्हा दाखल आहे अथवा खटला न्यायप्रविष्ट आहे किंवा ज्या उमेदवारांविरुद्ध दाखल खटल्यातून उमेदवारांची भरतीपूर्वी किंवा भरतीनंतर निर्दोष मुक्तता झालेली आहे अशा उमेदवारांना नियुक्ती देण्यात येऊ नये. अशा उमेदवारांना नियुक्ती देण्यासंदर्भातील सर्व प्रस्ताव शासन स्तरावर गठित उच्चस्तरीय समितीपुढे विनाविलंब विचारार्थ सादर करणे नियुक्ती प्राधिकाऱ्यावर बंधनकारक राहिल.

६. **वैद्यकिय तपासणी.**—निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकिय तपासणी संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या तरतुदी लागू होतील. याशिवाय वैद्यकिय चाचणीत दृष्टीदोष, तिरळेपणा, रातआंधळेपणा, वर्णांधतेपणा, गुडघ्यास गुडघा लागणे, सपाट तळवे, त्वचारोग, छातीचे रोग व महासंचालकांनी वेळोवेळी विहित केलेल्या वैद्यकिय चाचण्यांचा समावेश असेल. या चाचण्यांमध्ये उमेदवारात दोष आढळल्यास अथवा उमेदवार अपात्र ठरल्यास त्यास नियुक्ती देण्यात येणार नाही.

